**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ७११/२०२२**

तक्रारकर्ता, श्रीमती उर्मिला पांडूरंग होले
१०२, जमुना केशव को.हौ.सो.लि,
जुनी डोंबिवली रोड, डोंबिवली (प), जि.ठाणे

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
शिवाई बालक मंदिर, डोंबिवली पूर्व, प्लॉट क्र.पी७५
फेज २, गांवदेवी शॉपींग सेंटर जवळ, निवासी विभाग
डोंबिवली पूर्व, ता.कल्याण, जि.ठाणे

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
शिवाई बालक मंदिर, डोंबिवली पूर्व, प्लॉट क्र.पी७५
फेज २, गांवदेवी शॉपींग सेंटर जवळ, निवासी विभाग
डोंबिवली पूर्व, ता.कल्याण, जि.ठाणे

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २१/५/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १७/२/२०२२ | २१/२/२०२२ | ५/४/२०२२ | ७/७/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२३/८/२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २१/५/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" शिवाई बालक मंदिर ही शाळा अस्तीत्वात आल्या पासुन ते २०२१ रोजी पर्यंतच्या शाळेच्या शालेय रोस्टरच्या छायांकित प्रती मिळण्याबाबत व इतर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.७/७/२०२२ रोजी सुनावणी घेऊन, *"जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाई बालक मंदिर, कल्याण यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस १५ दिवसात निशुल्क उपलब्ध करुन द्यावी."* असा निर्णय दिलेला आहे.

नस्तीवरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दिसून आले की, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवाई बालक मंदिर यांना आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त झालेली नाही. प्रस्तुत प्रकरणावर पुढील तारखेस सुनावणी ठेवणे उचित होईल.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी दि.२६/६/२०२५ रोजी होईल. याबाबत आयोग कार्यालयाने संबंधितांस सुनावणी सूचना काढावी.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ मे, २०२५ .

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

Comp-३